मंत्रालयीन सेवा

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
५ वा मजला, मुख्य इमारत
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दूरध्वनी क्र ०२२-२२०२६९१३ Email ID :shrikant.yadav@nic.in

---

क्रमांक : संकिर्ण ११२४/अ.सं.क्र.१९/का-३ दिनांक :२३.०८.२०२४

**प्रति,**

प्रबंधक(निरि-१),
मा.उच्च न्यायालय, मुंबई

**विषय:-** पिठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, अमरावती व नाशिक या पदांवरील नियुक्तीबाबत.

**माननीय महोदय,**

उपरोक्त विषयाबाबतच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महसूल व वन विभागाने पिठासीन अधिकारी भूसंपादन पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, अमरावती व नाशिक येथे प्रत्येकी एका पिठासीन अधिकारी अशी एकूण दोन पदांवर नियुक्ती करण्यासाठी जिल्हा न्यायाधिश संवर्गातील सुयोग्य न्यायिक अधिकारी यांच्या नावांची शिफारस मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्याकडुन प्राप्त करण्याची विनंती केली.

२. त्यानुषंगाने नमूद करण्यात येते की, भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम ५१ नुसार नाशिक, कोकण, पुणे या तीन महसुली विभागांसाठी नाशिक व अमरावती महसुली विभागाकरिता अमरावती येथे भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधकरणांची स्थापना करण्याबाबतची अधिसूचना व नागपुर आणि औरंगाबाद येथील प्राधिकरणांच्या अधिकारक्षेत्रामध्ये सुधारणा करण्याबाबतची अधिसूचना राजपत्रामध्ये दि. १६.०८.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच मा उच्च न्यायालयाने रिट याचिका (एल) क्र.११२०, १३१३ व १३०४/२०२४ तसेच रिट याचिका क्र ६३३०/२०२१ मध्ये प्राधिकरण कार्यवित करण्यासाठी सर्व रिक्त पदे भरण्याचे निर्देश दिले आहेत.

misc. १.docx

३. तरी, भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ५२ (१) मधील तरतुदीनुसार पिठासीन अधिकारी, भूमीसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना प्राधिकरण, नाशिक या दोन पदांवर नियुक्ती करण्यासाठी "जिल्हा न्यायाधिश" या संवर्गातील सुयोग्य न्यायिक अधिकारी यांच्या नावांची शिफारस करण्यात यावी, ही विनंती.

**आपला,**

**( श्री.च.यादव )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

misc. १.docx